**ठळक बातम्या**

- राज्यातल्या २३ नगर परिषदा आणि नगर पंचायतींसाठी शांततेत मतदान सुरू
- मुंबई महापालिकेची निवडणूक एकट्यानं लढवण्यावर काँग्रेस ठाम
- काँग्रेस नेत्या सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्याविरोधातलं आरोपपत्र फेटाळण्याच्या निर्णयाला ईडीकडून दिल्ली उच्च न्यायालयात आव्हान

आणि

- जागतिक पातळीवर नवीन सत्ताकेंद्र निर्माण झाल्याचं परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांचं प्रतिपादन

<><><><><>

राज्यातल्या २३ नगर परिषदा आणि नगर पंचायतींच्या अध्यक्ष आणि सदस्यपदांसाठी, तसंच विविध नगरपंचायतींमधल्या १४३ सदस्य-पदांसाठी आज सकाळपासून शांततेत मतदान सुरू आहे. सकाळी साडेसातला मतदानाला सुरुवात झाली असून साडेपाचपर्यंत ते सुरू राहणार आहे.

**लातूर** जिल्ह्यातल्या निलंगा नगरपरिषदेसाठी दुपारी दीड वाजेपर्यंत साडे ३७ टक्क्यापेक्षा जास्त, तर रेणापूर नगरपंचायतीसाठी जवळपास ४६ टक्के मतदानाची नोंद झाली आहे.

**पालघर** नगर परिषदेसाठी दुपारी दीड वाजेपर्यंत ४० टक्के, तर वाडा नगरपंचायतीसाठी ३९ टक्के मतदान झालं आहे.

**सांगली** जिल्ह्यात शिराळा नगरपंचायतीसाठी ५३ टक्क्यापेक्षा जास्त मतदानाची नोंद झाली आहे.

अकोला जिल्ह्यात बाळापूर नगरपरिषदेसाठी मतदान सुरू आहे.

**वाशिम**मध्ये ७५ हजारापेक्षा जास्त मतदार आपला मतदानाचा हक्क बजावत आहेत.

**यवतमाळ** जिल्हा परिषदेसाठी मतदान सुरू आहे. अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या नगराध्यक्षपदासाठी ९ उमेदवार रिंगणात आहेत.

**नांदेड** जिल्ह्यातल्या धर्माबाद इथं मतदान सुरू असताना पैशाचं वाटप होत असल्याच्या आरोपावरून गोंधळ झाला. लग्नाच्या हॉलमध्ये कथितरीत्या काही मतदारांना अडवून ठेवल्याचं वृत्त खासगी वाहिन्यांनी दिलं होतं. मात्र निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी याचं खंडन केलं आहे. पोलिस आणि निवडणूक पथकानं भेट दिली असता इथं कोणीही आढळून आलं नाही, असं निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी सांगितलं.

<><><><><>

बृहन्मुंबई महानगरपालिकेची आगामी निवडणूक काँग्रेस स्वबळावर लढणार आहे. काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत ही घोषणा केली. सर्व २२७ जागांवर लढायची काँग्रेसची तयारी असल्याचं ते म्हणाले. मुंबई हे मोठं शहर असून देशाच्या विविध भागांमधून आलेले लोक इथं राहतात. त्यांच्यात एकता राखण्यासाठी आणि त्यांच्या हितासाठी काँग्रेसनं हा निर्णय घेतल्याचं त्यांनी सांगितलं. या निवडणुकीतही धर्मा-धर्मामध्ये फूट पाडायचा प्रयत्न होत असून हे राजकारण संपायला हवं, असं मत त्यांनी मांडलं.

<><><><><>

आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी  मुंबईत भाजपाचे नेते आणि सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांची भेट घेतली. या भेटीमध्ये मुंबई महानगरासह इतर महापालिकांच्या निवडणुकांसंदर्भात विविध मुद्द्यांवर सविस्तर चर्चा झाल्याचं त्यांनी आपल्या समाज माध्यमांवर सांगितलं.

<><><><><>

शिवसंग्राम पक्ष आगामी महानगरपालिका निवडणुका लढवणार असल्याचं शिवसंग्रामच्या अध्यक्षा डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी सांगितलं. लोकनेते विनायकराव मेटे विकास आघाडीच्या माध्यमातून पक्ष निवडणूक लढणार असल्याचं त्या म्हणाल्या. या संदर्भात काल मुंबई, ठाणे, पुणे, नवी मुंबई इथल्या पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. त्यानंतर हा निर्णय जाहीर करण्यात आला.

<><><><><>

शेतकऱ्यांना धमकावून किडनी विकणारं मोठं रॅकेट राज्यात सक्रिय असून याची चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी केली. या प्रकरणी पोलिसांकडे वारंवार तक्रार करुन देखील पोलिसांनी काहीच कारवाई न केल्याचा आरोपही त्यांनी माध्यमांसमोर केला. राज्यात शेतकऱ्यांना किडनी विकण्याची वेळ महायुती सरकारने आणली हे सरकार शेतकऱ्यांना उद्ध्वस्त करणारं आहे अशी टीकाही वडेट्टीवार यांनी केली.

**<><><><><>**

नागपूरमध्ये पाण्याची टाकी कोसळून झालेल्या दुर्घटनेत बिहारच्या सहा स्थलांतरित मजुरांचा मृत्यू झाला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी  मृतांच्या वारसांना पाच लाख रुपये मदत जाहीर केली आहे. तर बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनीही  २ लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे.

याशिवाय, संबंधित कंपनी मृतांच्या वारसांना 30 लाख रुपये देणार असून, जखमींना 10 लाख आणि उपचारांचा खर्च देण्याचं देखील कंपनीनं  मान्य केलं आहे. ही दुर्घटना नागपूरच्या बुटीबोरी एमआयडीसीतल्या एका कंपनीत  काल सकाळी घडली होती.

**<><><><><>**

ईडी अर्थात सक्तवसुली संचलनालयानं नॅशनल हेराल्ड प्रकरणी आरोपपत्र फेटाळण्याच्या कनिष्ठ न्यायालयाच्या निर्णयाला दिल्ली उच्च न्यायालयात आव्हान दिलं आहे. नॅशनल हेराल्ड प्रकरणात आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा आरोप करत काँग्रेस नेत्या सोनिया गांधी, राहुल गांधी यांच्यासह इतरांवर ईडीनं आरोपपत्र दाखल केलं होतं. दिल्लीतल्या राऊज अव्हेन्यू न्यायालयानं हे आरोपपत्र फेटाळलं होतं मात्र याप्रकरणी तपास सुरू ठेवण्याची मुभा दिली होती. आरोपपत्र फेटाळण्याच्या या निर्णयाला स्थगिती देण्याची ईडीची मागणी आहे.

**<><><><><>**

ठाणे जिल्ह्यात भिवंडी इथल्या न्यायालयानं आज काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्याविरुद्धच्या खटल्याची सुनावणी १७ जानेवारीपर्यंत पुढे ढकलली आहे. याप्रकरणी राहुल गांधी यांना जामीन मिळाला आहे. त्यासाठी माजी गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर

हे जामीन होते. पण चाकूरकर यांचं निधन झाल्यानं नवीन जामीन देण्यासाठी ही सुनावणी पुढे ढकलली आहे.

<><><><><>

बँक कर्ज घोटाळ्यासंदर्भात उद्योजक अनिल अंबानी यांचा मुलगा जय अनमोल अंबानी याची ईडीनं आज सलग दुसऱ्या दिवशी चौकशी केली आहे. मनी लॉन्डरिंग प्रतिबंधक कायद्या अंतर्गत ३४ वर्षीय जय अनमोल अंबानी याचे जबाब नोंदवण्यात आल्याचं अधिकाऱ्यानं सांगितलं.  याप्रकरणी ईडीनं अनिल अंबानी यांची देखील चौकशी केली आहे.

<><><><><>

गडचिरोलीतल्या दिनेश गावडे खून प्रकरणी राष्ट्रीय तपास यंत्रणेनं सीपीआय माओवादी या बंदी असलेल्या संघटनेच्या दोन नक्षलवाद्यांना अटक केली आहे. पोलिसांचा खबरी असल्याच्या आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा सदस्य असल्याच्या संशयावरून गावडे याचा दोन वर्षांपूर्वी खून झाला होता. या प्रकरणी एनआयएनं आणखी ४ जणांविरुद्ध आरोपपत्र दाखल केलं होतं. या प्रकरणाचा पुढचा तपास सुरू आहे.

<><><><><>

जागतिक पातळीवर आर्थिक आणि राजकीय प्राधान्यक्रमात आमूलाग्र बदल झाले असून अनेक नवी सत्ताकेंद्रं तयार झाली आहेत, असं निरीक्षण परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस. जयशंकर यांनी आज पुण्यात नोंदवलं. सिंबायोसिस अभिमत विद्यापीठाच्या २२व्या दीक्षांत समारंभात ते बोलत होते.

<><><><><>

बुलढाणा जिल्ह्यातल्या कदमापूर इथल्या जिल्हा परिषद शाळेतले विद्यार्थी अवघ्या काही सेकंदात गुणाकार, भागाकार, बेरीज-वजाबाकी करतात आणि स्वतःच त्यांची पडताळणीही करतात. या उपक्रमाविषयी त्यांचे गणिताचे शिक्षक राजेश कोगदे यांनी आकाशवाणीला अधिक माहिती दिली.

- - -होल्ड  बाइट - राजेश कोगदे - -

याशिवाय या विद्यार्थ्यांना जर्मन भाषासुद्धा शिकवली जाते. तसंच डिजिटल व्यवहारांचं ज्ञान मिळावं यासाठी दीडशे विद्यार्थ्यांची बँकेत खाती उघडण्यात आली आहेत. या बँक खात्यातल्या पैशातून विद्यार्थी - पेन, पेन्सिल, वही, पुस्तकं खरेदी करतात.

**<><><><><>**

टी -२० क्रिकेट विश्व् चषक स्पर्धेच्या संघातून निवड समितीनं भारताचा उपकर्णधार शुभमन गिल याला वगळलं आहे.  सूर्यकुमार यादव कडे कर्णधारपद कायम ठेवण्यात आलं आहे. राष्ट्रीय निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर यांनी आज १५ सदस्यीय संघाची घोषणा केली. त्याच्या जागी अष्टपैलू अक्षर पटेल याला उपकर्णधार पद देण्यात आलं आहे. आहे. ईशान किशन आणि रिंकू सिंग यांना संघात स्थान पुन्हा स्थान मिळालं आहे.

**//<><><><><>//**